**महाराष्ट्रातील इतर मागासवर्गीयांच्या यादी राज्य मागासवर्ग आयोगाच्या १९९३ ते २००० पर्यंतच्या १-७ अहवालानुसार विमुक्त जाती व भटक्या जमातीत नव्याने समाविष्ट केलेल्या इतर मागासवर्गातील जाती वगळण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

विमुक्त जाती, भटक्या जमाती इतर मागासवर्ग आणि
विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग
शासन निर्णय क्रमांक सीबीसी-१०९८/प्र.क्र.१८५/इमाव-५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.
दिनांक :- १४ फेब्रुवारी, २००१

वाचा - (१) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक : सीबीसी -१०९१/३०५/मावक-५, दिनांक १८ जाने. १९९३.

(२) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक : सीबीसी -१०९३/७४९२/प्र.क्र. २८/मावक-५, दिनांक १५ मार्च, १९९३.

(३) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक : सीबीसी -१०९३/७४९२/प्र.क्र. २८/मावक-५, दिनांक १५ मार्च, १९९३.

(४) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक : सीबीसी -१०९३/७४९२/प्र.क्र. २८/मावक-५, दिनांक ३० जून, १९९७.

(५) शासन निर्णय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग,
क्रामंक: सीबीसी १०९८/प्र.क्र.१८५/इमाव-५, दि. १ जानेवारी, २००१.

(६) शासन निर्णय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष, मागासप्रवर्ग कल्याण विभाग,
क्रमांक : सीबीसी १०९८ / प्र.क्र. १८५ / इमाव-५, दि. १४ फेब्रुवारी, २००१.

**प्रस्तावना :-**

मंडल आयोगाबाबत केंद्र शासनाद्वारे निर्गमित केलेल्या आदेशाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिका क्र.९३०/९० इंदिरा सहानी आणि इतर विरुद्ध भारत सरकार व इतर यावर दिनांक १६ नोव्हेंबर,१९९२ रोजी दिलेल्या निकालातील सर्वोच्च न्यायालयाचे निदेशानुसार इतर मागासवर्गीयांच्या यादीमध्ये नव्याने समावेश करण्यासाठी व वगळण्यासाठी आलेल्या मागण्या व तक्रारी याबाबत तपासणी करुन शिफारस करण्यासाठी तसेच इतर मागासवर्गीयांच्या यादीमधील प्रगत व उन्नत गट किंवा व्यक्ति निर्धारित सामाजिक -आर्थिक निकषानुसार वगळण्याबाबत अभ्यासपूर्ण शिफारशी करण्यासाठी दिनांक १५ मार्च, १९९३ च्या शासन निर्णयान्वये राज्य शासनाने स्थायी समितीची स्थापना केली आणि दिनांक १९ मे, १९९५ च्या शासन निर्णयान्वये या स्थायी समितीचे " राज्य मागासवर्ग आयोग"

असे नामकरण करण्यात आले.

२. अशाप्रकारे इतर मागासवर्गात तसेच विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गात समावेश करण्याबाबतची प्राप्त झालेली निवेदने तपासणी करुन शिफारस करण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगाकडे पाठविण्यात आली. राज्य मागासवर्ग आयोगाने सन १९९३-२००० या कालावधीत एकूण २२६ जातीबाबत ७ अहवाल शासनास सादर केले. सदरच्या अहवालात इतर मागासवर्ग प्रवर्गात समाविष्ट करावे. तसेच विजाभज प्रवर्गात समाविष्ट करावेत म्हणून शिफारस केलेल्या जातींच्या शिफारशींची तपासणी करुन त्यावर निर्णय घेण्याची बाब ब-याच कालावधीपासून शासनाच्या विचाराधीन होती. त्यावर सर्वंकष विचार करुन शासनाद्वारे विमुक्त जाती/भटक्या जमाती प्रवर्गाबाबत तसेच इतर मागासवर्ग प्रवर्गाबाबत निर्णय घेतला असून नव्याने समाविष्ट करावयाच्या विमुक्त जाती/भटक्या जमाती तसेच इतर मागासवर्ग प्रवर्गाच्या यादीत तशी सुधारणा करण्याचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित केले आहेत. राज्य मागासवर्ग आयोगाने विमुक्त जाती /भटक्या जमाती प्रवर्गात समाविष्ट करावे अशा शिफारशी केलेल्या काही जाती शासनाच्या निर्णयाआधी इतर मागासवर्ग प्रवर्गाच्या यादीत समाविष्ट होत्या. शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार त्यांचा आता नव्याने विमुक्त जाती, भटक्या जमाती प्रवर्गात समावेश करण्यात आला असल्यामुळे त्या जाती त्यांच्या इतर मागासवर्ग प्रवर्ग या मूळ प्रवर्गातून वगळणे आवश्यक आहे. त्यानुसार शासन आता खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**<u>शासन निर्णय</u> :-**

महाराष्ट्र राज्याच्या इतर मागासवर्ग प्रवर्गात समाविष्ट असलेल्या खालील जातींचा समावेश विमुक्त जाती, भटक्या जमाती प्रवर्गात संदर्भाधीन अनुक्रमांक ५ येथील शासन निर्णयान्वये नव्याने करण्यात आला असल्यामुळे या शासन निर्णयाद्वारे खालील जाती इतर मागासवर्गाच्या मूळ यादीतून वगळण्यास शासन मंजुरी देत आहे.

| अनुक्रमांक | यादीतील अनुक्रमांक | जातीचे नांव |
|---|---|---|
| १ | ३७ | गडारिया |
| २ | ३८ | गड्डी |
| ३ | ४० | गारपगारी |
| ४ | ५४ | जोगी |
| ५ | १४८ | नाथ |
| ६ | २०७ | गोसाई |
| ७ | २३७ | नाथपंथी |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने

**( अशोक खोत )**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

राज्यपालांचे सचिव,

मुख्यमंत्र्यांचे सचिव

सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
मुख्य महानगर दंडाधिकारी,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हा दंडाधिकारी,
सर्व उप विभागीय अधिकरी ( महसूल)
तथा उप विभागीय दंडाधिकारी,
सर्व तालुका कर्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा खंडपीठ - नागपूर,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा खंडपीठ - नागपूर,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा खंडपीठ- औरंगाबाद,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा खंडपीठ - औरंगाबाद,
संचालक समाजकल्याण/ विजाभज, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
संचालक, माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, प्राथमिक शिक्षण ,महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, आदिवासी कल्याण, महाराष्ट्र राज्य, नाशिक,
संचालक, आदिवासशी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
सदस्य सचिव, राज्य मागासवर्ग आयोग, पुणे,
सर्व मंत्रालयीन विभाग,

**त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांना हयाबाबतच्या सूचना द्याव्यात.**

सर्व विभागीय समाजकलयाण अधिकारी/ सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे समाजकल्याण अधिकारी,
जिल्हा समाजकल्याण अधिकारी, बृहन्मुंबई/ मुंबई उपनगरे,
महा संचालक, माहिती व जनसंपर्क महा संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
सर्व कक्ष अधिकारी, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभाग , मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती/ इमाव -५,विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभाग , मंत्रालय, मुंबई.

---------